

**प्रथम क्रमांक**

खेड्यातून आलेला शंभू आपल्या बायकोला घेऊन दवाखान्यात आला. तिची पाठदुखीची तक्रार होती. डॉक्टरांनी तिला तपासले आणि कागदावर प्रिस्क्रिप्शन लिहून तो कागद शंभूच्या हातात दिला आणि म्हणाले, ''घरी गेल्यावर हे बायकोच्या पाठीला चोळा.''

अर्ध्या तासाने शंभू परत आला आणि डॉक्टरांना म्हणाला, ''पण डॉक्टर कुठल्या बाजूने चोळू? लिहिलेल्या की कोऱ्या?''

**अनिल भिकाजी सावंत,** चेंबूर, मुंबई



**द्वितीय क्रमांक**

बंडोपंतांची पंजाबला बदली झाली. बिचारे एकटेच पंजाबला गेले. ऑफिसला गेल्यानंतर आलेले निरोप मिळावे म्हणून फोनला आन्सरिंग मशीन लावले व त्यावर खालील मेसेज रेकॉर्ड केला- 'मी घरी नाही. काही निरोप असल्यास ठेवावा.'

चार-पाच दिवसांत आन्सरिंग मशीन बंद करायची वेळ आली. कारण थोड्या बहुत फरकाने खालील मेसेजेस रेकॉर्ड झाले, 'साला! ५५५५, खुद फोन उठाता है, और बोलता है घर में नहीं है. ५५५५, ५५ खडाड्खट् फोन आपटल्याचा आवाज.

**सुनीता नाईक,** ठाणे (प.)



**तृतीय क्रमांक**

प्रभाकरराव खटला जिंकले. वकिलाने त्यांना मेल पाठवून कळविले, 'बघा, सत्याचाच विजय झाला!'

थोड्या वेळाने वकिलाला मेलचं उत्तर आलं, ''हरकत नाही, वरच्या कोर्टात अपील करा. 'सत्याला' चांगला धडा शिकवू!''

**मोहन पाठक,** ठाणे.




बाबुकाका व त्यांच्या सौभाग्यवती ज्योतिषाकडे मुलाची पत्रिका घेऊन जातात.

ज्योतिषी (पत्रिका पाहून): तुमचा मुलगा एक मिनिट उशीरा जन्माला आला असता तर चक्रवर्ती राजा झाला असता.

सौभाग्यवती बाबुकाकांना : बघा, तरी मी सांगत होते एक मिनिट थांबा.

**सुनीता नाईक,** श्रीनगर, ठाणे



एक सरदारजी डॉक्टरकडे गेला. त्याचे दोन्ही कान भाजले होते. डॉक्टरांनी विचारले,'काय झालं सरदारजी?'

सरदार : काही नाही. मी कपड्यांना इस्त्री करत होतो की मध्येच फोन वाजला.

डॉक्टर : मग काय झालं?

सरदार : मी चुकून फोनऐवजी हातातली इस्त्री कानाला लावली. म्हणून माझा एक कान भाजला.

डॉक्टर : कोणाचा फोन होता?

सरदार : तो एक रॉंग नंबर होता.

डॉक्टर : पण दुसरा कान कसा भाजला?

सरदार : त्या मूर्खाने मला पुन्हा फोन केला.

**तन्वी मळेकर,** दहिसर.

बब्या बिछान्यात चुळबुळत होता. काही दिवसांपासून त्याची रात्री झोपण्यासाठी स्वतंत्र खोलीत रवानगी होत होती. आईच्या कुशीत झोपायची सवय मोडणं त्याला कठीण जात होतं. त्यात आता त्याला तहान लागली होती. 'आई... आई...' पार्टिशन ठोठावत त्यानं हाक मारली, 'मला तहान लागलीय, पाणी दे ना.'

'किती छळतोस रे बब्या.' आई कातावली, 'मघाशी झोपण्यापूर्वी पी म्हणत होते पाणी, तेव्हा नखरे करत होतास आता तुझा तूच जा स्वयंपाकघरात आणि पी पाणी.'

'पण मला अंधारात भीती वाटते.'

'मग झोप तसाच तहानेला. एवढा मोठा घोडा झालाय आणि अंधाराची भीती वाटतेय म्हणतो.'

परत थोड्या वेळाने बब्यानं पार्टिशन ठोठावलं. 'आई... पाणी...'

'बब्या, आता पुन्हा पाणी मागितलंस ना तर तिकडे येऊन फटकावीन तुला चांगली.' थोडा वेळ शांतता.

पुन्हा पार्टिशनवर ठकठक, 'आई इकडे मला फटकावयाला येशील तेव्हा पाणी घेऊन येशील का प्लीज ?'

**निर्मला गोखले,** विलेपार्ले.

एक श्रीमंत गृहस्थ होते. त्यांच्याकडे लाखो रुपये होते. त्यांची पत्नी वारल्यावर त्यांना सारखे वाटायचे, आपण किती जगणार ? आपण मेल्यावर आपली सर्व संपत्ती सरकारजमा होणार. आपण या संपत्तीचा उपभोग घेणार की नाही ? तेव्हा ते एका प्रसिद्ध ज्योतिषाकडे गेले. ज्योतिषी म्हणाले, 'मी एका प्रश्नाचे १०० रुपये घेतो'. त्यांनी १०० रुपये फी दिली. ज्योतिषी म्हणाले, 'तुमचा काय प्रश्न आहे ?' 'महाराज, मी किती वर्षे जगणार ?' तेव्हा ज्योतिषी हात पाहून म्हणाले, 'तुम्ही फक्त दोन वर्षे जगणार.' तेव्हा ते गृहस्थ जवळजवळ ओरडलेच, 'बाप रे ! फक्त दोन वर्षे ?' तेव्हा ज्योतिषी पुन्हा त्यांचा हात पाहून म्हणाले, 'आणखीन १०० रुपये द्या. एक वर्ष वाढवून देतो.'

**– मधुकर अ. पाटील,** कांदिवली

'हेलिकॉप्टर कसे चालवावे' या विषयावर एक प्रशिक्षक आपल्या विद्यार्थिनींना प्रशिक्षण देत म्हणाला, ''आता तू स्वतः हेलिकॉप्टर चालव. मी खाली राहून तुझ्याशी रेडिओद्वारा संपर्क साधत राहील.''

१,००० फूट वर पोहोचल्या नंतर प्रशिक्षकाने चालक विद्यार्थिनीला विचारलं, 'कसं वाटत आहे ?'

ती म्हणाली, 'चांगले वाटत आहे.'

२००० फुटावर पोहोचल्यानंतर परत प्रशिक्षकाने विचारले, 'आता कसे वाटत आहे ?'

तेव्हा विद्यार्थिनी म्हणाली, 'आणखीनच चांगलं !'

जवळजवळ ३००० फूट उंचीवर हेलिकॉप्टर पोहोचल्यानंतर चक्कर खात खाली पडलं. त्या विद्यार्थिनीला बाहेर काढत प्रशिक्षक म्हणाला, 'तू तर चांगल्या प्रकारे हेलिकॉप्टर चालवत होती. मग हे असं कसं झालं ?'

तेव्हा ती म्हणाली, '२५०० फूट उंच पोहोचल्यानंतर मला थंडी भरून आली. शेवटी मी हेलिकॉप्टरचा पंखाच बंद केला.'

**शोभा राजेंद्र जैन ,** चाळीसगाव

'मुलगा वारंवार गैरहजर राहतो' या कारणासाठी मुख्याध्यापकांनी हॉलीवूडमधील एका अभिनेत्रीला भेटायला बोलावले. 'बाई, तुमचा मुलगा फार वेळा कारण न देता गैरहजर राहतो, याचं काही स्पष्टीकरण देऊ शकाल का ?' यावर ती अभिनेत्री म्हणाली, 'काय करणार सर, माझ्या लग्नाला तो हजर नसेल तर ते वाईट दिसेल ना ? त्यामुळे नाइलाजाने त्याला शाळा बुडवावी लागते.'

**– वि. म. सत्तूर येरवडा,** पुणे

पतीने केलेला स्वादिष्ट चहा प्यायल्यावर पत्नी म्हणाली, 'असा चहा करायला आईकडून शिकलात ना ?'

पती – मी वडिलांकडून शिकलो.

**– जयसिंग जंगम** महाड

'अहो' आणि 'अगं'
पती - तू रागावणार नसशील तर तुला मी एक गोष्ट सांगतो, लग्नापूर्वी माझी चार प्रकरणे होती.
पत्नी - तुम्हीही रागावणार नसाल, तर तुम्हाला मी सांगते की, लग्नापूर्वी माझीही चार प्रकरणे होती, त्यातील दोन अजूनही सुरूच आहेत.

ल्नवरा विचारतो : आपण कोण आहात ?
डॉक्टर सांगतो : तुझ्या बायकोला मृत्यूच्या दाढेतून वाचविणारा मी डॉक्टर आहे.
नवरा म्हणतो : तुमचे आभार मानावे की तुम्हाला धक्के मारून हाकलावे या संभ्रमात मी पडलो आहे.

पती : तुला लग्नाआधी किती प्रियकर होते ?
उत्तर देत नाही म्हणून तो चिडून म्हणतो, 'सांगत का नाहीस ? लाज वाटते का ?'
पत्नी : रागावू नका नका, ती यादीच तर मी मनात आठवण करून करून करीत आहे. मला डिस्टर्ब करू नका.

व्एक मैत्रीण दुसऱ्या मैत्रिणीला म्हणते की, तुझ्या घरची भांडी फारच चकाचक दिसतात. भांडी घासण्यासाठी तू काय वापरतेस ?
दुसरी मैत्रीण उत्तर देते : नवरा.

एका कोर्टात पत्नीविरुद्ध घटस्फोटासाठी केस सुरू असते. पतीचे वकील तिला विचारतात की, तू तुझ्या पतीची फसवणूक केली काय ?
पत्नी सांगते :- मुळीच नाही. उलट पतीनेच माझी फसवणूक केली. दौऱ्यावरून तीन दिवसांनी परत येतो म्हणून सांगितले व पहिल्याच दिवशी रात्री १२.०० वाजता ते परत आले. ही माझी फसवणूक नाही काय ?
कोर्ट हसले व नवऱ्याचा घटस्फोटाचा अर्ज त्वरित मंजूर केला.
**मो. बा. चरेगावकर,** यवतमाळ

कोर्टात केस चालू होती. न्यायाधीशांनी कोर्टात साक्षीदार म्हणून आलेल्या एका डॉक्टरांना त्यांचेच प्रिस्क्रिप्शन देऊन ते वाचावयास सांगितले. ''मला हे वाचता येणार नाही.'' डॉक्टर म्हणाले, ''हे अक्षर तर माझेच आहे. पण गेल्या वर्षीचे आहे.''
**नम्रता प्रकाश जांगळे,** बेळगाव

राजेश आणि सुनीता यांचे एका छोट्याशा कारणावरून भांडण जुंपले! तसे दोघेही शांत! पण त्या दिवशी काय झाले कोण जाणे ? दोघांचाही पारा चढलेला होता. राजेश रागाने जोरात ओरडला- 'माझा अंत पाहू नकोस... नाहीतर माझ्यातला पशू खवळेल!'
सुनीता म्हणाली, 'हूँ! खवळू दे ना! उंदराला कोण घाबरतंय!'
**पुष्पा बल्दवा,** ठाणे

शाळा तपासण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्याने सहज एका विद्यार्थ्याला विचारले, ''तुमच्या वर्गात आळशी कोण आहे ?''
तो विद्यार्थी बुचकळ्यात पडून म्हणाला, ''ते कसं सांगता येईल ?''
''हे बघ, मी तुला एक युक्ती सांगतो. वर्गात गणित सोडवताना कोण स्वस्थ बसलेले असते ?'' अधिकाऱ्याने विचारले.
तो मुलगा म्हणाला, ''गुरुजी!''
**श्रद्धा मनोहर कटके,** मुंबई

वक्तशीरपणाबद्दल गजाननराव तसे आपल्या मित्रमंडळीत फारच नावाजलेले होते. किंबहुना त्यांचा एक दरारा होता. कित्येक वेळा नाटक वेळेवर सुरू न झाल्यामुळे पैशांची पर्वा न करता ते नाट्यगृहातून बाहेरही पडले आहेत. सहलींचा

आनंदसुद्धा या सवयीमुळे ते गमावून बसले आहेत.
अखेर वयोमानानुसार थोड्याशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. बातमी सर्वदूर पसरली. मित्रमंडळीत चर्चा सुरू झाली, ''लवकर चला. वेळेवर चला. नाहीतर गजाननराव रागावतील.''
बॉडी अजून का बाहेर आणीत नाहीत म्हणून चर्चा सुरू झाली.
अखेर एकास न राहवून तो म्हणाला, ''अरे, वेळेवर उचला, नाहीतर गजाननराव रागाने उठून बसतील.''
**अरुण ज. वैद्य,** मुंबई

ताटात कारल्याची भाजी पाहून पतिराजांनी नाक मुरडले. मालतीबाई चिडल्याच. तणतणत म्हणाल्या, ''सोमवारी कारलं चाललं. मंगळवार-बुधवारीही तुम्ही काही बोलला नाहीत. गुरुवारी तर मी डब्यातही दिली होती. मग आजच (शुक्रवारी) काय झालं हो नाक मुरडायला?''
**मोहन पाठक,** ठाणे.

पूर्वी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे अंकगणित कसे आहे हे जाणून घेण्यासाठी शिक्षक तोंडी हिशेब विचारीत असत. यात सर्व काही असे. बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार इत्यादी. त्या दिवशी पुराणिक गुरुजी सातवीच्या वर्गाचा तास घेत होते. त्यांनी मुलांना हिशेब विचारला.
'तुला वडिलांनी वीस रुपये दिले आणि दोन पोस्टकार्ड, दोन आंतर्देशीय पत्रे, तीन पाकिटे व दोन पावती तिकिटे (रेव्हेन्यू स्टॅम्प) आणण्यास सांगितले तर किती पैसे परत येतील?'
या सर्वांचा खर्च विचारात घेऊन तो वीस रुपयांतून वजा करून विद्यार्थ्याने उत्तर द्यावे अशी गुरुजींची अपेक्षा होती. त्यामुळे पोस्टाबाबतची विद्यार्थ्यांची माहितीही किती आहे ते कळत असे.
प्रश्न विचारलेला विद्यार्थी, राम जाधव त्याचे नाव, हा अतिशय हुशार होता. तितकाच वांड होता. आपली हुशारी तो विघातक आणि अभ्यासाव्यतिरिक्त विषयात मोठ्या कौशल्याने वापरत असे.
तो म्हणाला, 'गुरुजी! पोस्टमास्तर म्हनत्यात तू कार्ड-पाकिटं घेऊन जा. उरलेलं पैसं मी तुझ्या बाकडं दिन. उगच तू वाटमंदी हरवाया नकुस.'
या उत्तरावर वर्गात हशा पिकला. पण पुराणिक गुरुजींनी कपाळाला हात लावला (रामने मोठ्या कल्पकतेने हिशेब करण्याचे टाळले होते.)
**अशोक आफळे,** कोल्हापूर.

This information belong to some authority I am just sending it for communication.
Please don't misuse of this. *Neo*